Epaper

दैनिक
जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। मंगळवार , दि. १३ ऑक्टोंबर २०२६ । वर्ष १ । अंक १८३ । पाने ४ । Title Code - T/MHJAN/2026/0422/5204/1306

DIGITAL EDITION

पाण्यात कर्करोगजन्य क्रोमियमचा गंभीर धोका!
(पान २ वर)



Selected

पश्चिम रेल्वेचा महत्त्वाकांक्षी विस्तार!

मुंबई । मुंबई उपनगरीय रेल्वे नेटवर्कवरील वाढता प्रवासी ताण कमी करण्यासाठी आणि लांब पल्ल्याच्या गाड्यांच्या संचालनाला नवा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी पश्चिम रेल्वेने हाती घेतलेल्या वसई रोड टर्मिनस प्रकल्पाने आता प्रत्यक्ष वेग घेतला आहे. सुमारे १०५ ते १५० कोटी रुपयांच्या घरात खर्च अपेक्षित असलेल्या या बहुद्देशीय प्रकल्पासाठी कंत्राटदारांची नियुक्ती पूर्ण झाली असून मार्च २०२८ पर्यंत हा संपूर्ण प्रकल्प प्रवाशांच्या सेवेत आणण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. यामुळे वसई-विरार, पालघर आणि ठाणे-नवी मुंबई परिसरातील लाखो प्रवाशांना थेट कनेक्टिव्हिटी मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. जोगेश्वरी येथील मालधक्क्याचे वसई परिसरात स्थलांतर हा याप्रकल्पाचा मुख्य भग आहे. सध्या जोगेश्वरी यार्डमधून सिमेट, ऑटोमोबाईल्स आणि इतर अवजड वस्तूंची वाहतूक होते.

ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी देशव्यापी आंदोलनाची तयारी

आता काँग्रेससोबत CJP देशव्यापी रणशिंग फुंकणार?

राजस्थानमधून आंदोलनाला सुरुवात, आंदोलन प्रमुख शहरांमध्ये लढा उभारण्याची रणनीती

जन सम्राट टाईम्स

मुंबई | मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीवरून राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे दिसत आहेत. कॉकरोच जनता पार्टी (CJP) देशभर आंदोलन उभारण्याच्या तयारीत असल्याचा दावा पुढे आला असून, या आंदोलनात काँग्रेससह अन्य विरोधी पक्षांना सहभागी करून घेण्याची रणनीती आखली जात असल्याचे वृत्त आहे.

जंतरमंतरवरील आंदोलनापुरते मर्यादित न राहता देशातील प्रमुख शहरांमध्ये आंदोलनाचा विस्तार करण्याचा CJP चा प्रयत्न असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, काँग्रेस या आवाहनाला कसा प्रतिसाद देते, यावर पुढील राजकीय घडामोडींचे चित्र अवलंबून राहणार आहे.CJP चे प्रवक्ते दीपक बालियान यांनी जयपूर येथे पत्रकार परिषद घेऊन मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधातील आंदोलन सुरूच ठेवण्याची भूमिका मांडल्याचे वृत्त आहे. त्यांच्या राजीनाम्याची मागणी पूर्ण होईपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जंतरमंतरवरील आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर रेल्वे, बस आणि मेट्रो सेवांवरील निर्बंध तसेच



इंटरनेट सेवेत व्यत्यय आल्याच्या मुद्द्यावरूनही त्यांनी केंद्र सरकारवर टीका केल्याचे सांगण्यात आले. आंदोलनकर्त्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा आणि लोकशाहीतील विरोधाचा मुद्दा उपस्थित करत CJP ने सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. आंदोलनाची व्याप्ती वाढविण्यासाठी CJP देशातील प्रमुख शहरांमध्ये कार्यक्रम आयोजित करण्याच्या तयारीत असल्याचे वृत्त आहे. स्थानिक पातळीवर मतदारयाद्यांमधील कथित त्रुटी, मतदारांची नावे वगळण्याचे आरोप आणि निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेच्या मुद्द्यांवर जनजागृती व आंदोलन करण्याची रणनीती आखली जात असल्याचे सांगितले जात आहे. जंतरमंतर हे आंदोलनाचे प्रमुख केंद्र असले, तरी देशाच्या विविध भागांत नागरिकांपर्यंत हे मुद्दे पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे पक्षाच्या भूमिकेतून दिसते. राजस्थानमधून या पुढील टप्प्याला सुरुवात झाल्याचा दावा करण्यात येत आहे. मात्र, विविध शहरांतील आंदोलनांचे वेळापत्रक आणि त्यातील सहभागाबाबत अधिकृत तपशील अद्याप स्पष्ट झालेला नाही.

मतदारांची नावे वगळणे, विशेष सखोल पुनरीक्षण अर्थात SIR प्रक्रिया आणि निवडणुकांमधील कथित अनियमितता या मुद्द्यांवर काँग्रेससह विविध विरोधी पक्षांनी यापूर्वीही प्रश्न उपस्थित केले आहेत. आता या मुद्द्यांवर CJP आणि काँग्रेस एकाच व्यासपीठावर येणार का, याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. दोन्ही पक्षांनी एकत्रितपणे आंदोलन केल्यास त्याची व्याप्ती वाढू शकते, अशी CJP ची भूमिका असल्याचे वृत्त आहे. मात्र, काँग्रेसने या प्रस्तावाला औपचारिक पाठिंबा दिल्याची पुष्टी उपलब्ध माहितीमध्ये नाही. त्यामुळे संयुक्त आंदोलनाची शक्यता आणि त्याचे स्वरूप याबाबत काँग्रेसची अधिकृत भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेची कसोटी

निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता, मतदारयाद्यांची अचूकता आणि निवडणूक आयोगाची निष्पक्षता हे लोकशाहीतील महत्त्वाचे मुद्दे आहेत. विरोधकांकडून उपस्थित करण्यात येणाऱ्या आरोपांवर तथ्यांच्या आधारे स्पष्टीकरण देणे आणि तक्रारींचे निराकरण करणे आवश्यक आहे. त्याचवेळी आरोपांची सत्यता सक्षम पुरावे आणि अधिकृत तपासणीतून स्पष्ट होणेही महत्त्वाचे आहे. आता CJP च्या आंदोलनाला किती प्रतिसाद मिळतो, काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्ष प्रत्यक्ष सहभागी होतात का, तसेच मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याच्या मागणीवर पुढे काय घडते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

३५ लाखांची सुपारी; जळगाव पोलिसांनी उधळला गँगवॉरचा डाव!

जन सम्राट टाईम्स

जळगाव । प्रतिनिधी: जळगाव आणि भुसावळ परिसरात संभाव्य रक्तरंजित गँगवॉर घडवून आणण्याचा कथित डाव रामानंदनगर पोलिसांनी उधळून लावला आहे. मिथुन बारसे, क्रिश बारसे आणि करण यांना लक्ष्य करण्यासाठी तब्बल ३५ लाख रुपयांची सुपारी दिल्याचा गंभीर आरोप तपासातून समोर आला आहे. या प्रकरणी आंतरजिल्हा टोळीतील पाच संशयितांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून चार गावठी कट्टे, नऊ जिवंत काडतुसे, धारदार शस्त्रे आणि ६२ ग्रॅम मेफेड्रोन (एमडी) अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. पोलिसांच्या या कारवाईमुळे संभाव्य हत्याकांडाचा कट उधळल्याचा दावा करण्यात आला आहे. पाच लाख रुपये आगाऊ दिल्याची माहिती पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भुसावळ येथील बंटी पथरोड आणि शिव पथरोड यांनी मिथुन बारसे, क्रिश बारसे आणि करण यांना लक्ष्य करण्यासाठी ३५ लाख रुपयांची सुपारी दिल्याचा आरोप आहे. यापैकी पाच लाख रुपये आगाऊ दिल्याची माहिती तपासात पुढे आली आहे. संबंधित तिघांची हत्या करून त्यांच्या अंगावरील सोने लुटण्याचाही कथित कट आखण्यात आल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

११ ऑक्टोबर २०२६ रोजी मध्यरात्री मिथुन बारसे आणि क्रिश बारसे हे जळगाव शहरातील कंजरवाडा परिसरात एका कार्यक्रमासाठी आले असताना त्यांच्यावर हल्ला करण्याची योजना असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्याचे सांगण्यात आले. संभाव्य हल्ल्याची



माहिती मिळताच रामानंदनगर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. पिंप्राळ्यात सापळा; इनोव्हा कारमधून पाच जण ताब्यात रामानंदनगर पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ११ ऑक्टोबरच्या मध्यरात्री पिंप्राळा परिसरातील भवानीमाता मंदिर ते सिल्क मिलसमोरील मोकळ्या जागेत सापळा रचण्यात आला. यावेळी इनोव्हा कारवर छापा टाकून पाच संशयितांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या झडतीत शस्त्रे आणि काडतुसे आढळून आल्याचे पोलिसांनी सांगितले. अटक करण्यात आलेल्या संशयितांची नावे खुशाल गजानन बोरसे (रा. खडकारोड, भुसावळ), संदीप बबन लोढे (रा. वाघनगर, जळगाव), राजू ऊर्फ ओमकार भदरगे (रा. शास्त्रीनगर, ठाणे), अरविंद विजय कांबळे (रा. कासोळा, जि. वाशिम) आणि सोनू महेंद्र जयस्वाल (रा. सातिवली, वसई, जि. पालघर) अशी आहेत. या कारवाईत चार गावठी कट्टे, नऊ जिवंत काडतुसे, धारदार शस्त्रे आणि अन्य साहित्य जप्त करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

उमाळ्यातील भाड्याच्या खोलीत एमडी ड्रग्जचा साठा अटक केलेल्या संशयितांची चौकशी केली असता, जळगाव तालुक्यातील उमाळा येथे त्यांनी एक खोली भाड्याने घेतल्याची माहिती समोर आली.

पोलिसांनी त्या खोलीची झडती घेतली असता आणखी दोन गावठी पिस्तुले, दोन जिवंत काडतुसे, विक्रीसाठी ठेवलेले ६२ ग्रॅम मेफेड्रोन (एमडी) अंमली पदार्थ आणि इलेक्ट्रिक वजनकाटा आढळून आला. या मुद्देमालाची किंमत दोन लाख २२ हजार ३०० रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. त्यामुळे कथित हत्येच्या कटासोबतच अंमली पदार्थांच्या साठवणुकीचा आणि संभाव्य व्यवहाराचा तपासही सुरू झाला आहे. जप्त केलेली शस्त्रे नेमकी कोठून आणली, त्यांचा वापर कोणत्या उद्देशाने होणार होता आणि अंमली पदार्थांच्या व्यवहारामागे आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा शोध पोलीस घेत आहेत. कथित सूत्रधारांसह आणखी चौघांची नावे या प्रकरणात बंटी पथरोड, शिव पथरोड, अभिषेक गोयर आणि रवी होळकर यांचीही आरोपी म्हणून वाढीव नोंद करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

दुष्काळात सरकार खंबीरपणे पाठीशी – एकनाथ शिंदे

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: नवरात्रोत्सवाच्या उत्साहात यंदा टेंभी नाक्याच्या देवीसमोर बळीराजासाठी साकडे घालण्यात आले. महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांवरील संकट दूर व्हावे, अशी प्रार्थना करतानाच या संकटाच्या काळात राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील; केंद्र सरकारकडूनही भरीव मदत मिळेल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. त्याचवेळी नवरात्रोत्सव मंडळांनीही उत्सवातील काही बचत दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी देऊन सामाजिक बांधिलकी जपावी, असे आवाहन त्यांनी केले. टेंभी नाका येथील 'श्री जय अंबे माँ सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळा'च्या आई दुर्गेश्वरीचा आगमन सोहळाआज मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी आई दुर्गेश्वरीची ढोल ताशे, लेझीम, टाळ मृदंग, कोळी नृत्य, गोंधळ नृत्य, आदिवासी तारपा नृत्य आणि इतर पारंपरिक कलाप्रकार सादर करून भव्य मिळवणूक काढण्यात आली. यानंतर देवीचे टेंभी नाका येथील मंडपात विधिवत पूजन करून तिची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.दुष्काळग्रस्त भागात केंद्राचे पथक पाहणी करून गेले असून मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली याबाबतची आढावा बैठक आज पार पडली आहे. पंतप्रधान नरेंद्र



मोदी यांची भेट घेतली असता त्यांनीही महाराष्ट्रातील दुष्काळ आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सविस्तर चर्चा केली आहे. केंद्र सरकारही मोठ्या प्रमाणात सहकार्य करेल, असे आश्वासन मोदी यांनी दिल्याचे शिंदे यांनी सांगितले. दुष्काळ जाहीर करण्याची मागणी पूर्ण करण्यात आली असून सवलती आणि नुकसानभरपाईसोबतच संकटग्रस्त कुटुंबांना आवश्यक ती मदत दिली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांच्या मुलींचे ठरलेले विवाह हा देखील गंभीर विषय असून सामूहिक विवाह सोहळ्यांच्या माध्यमातून ही जबाबदारी शिवसेनेकडून उचलली आहे. मराठवाड्यातील २५ हजार शेतकरी कुटुंबातील मुलींना सायकली आणि २५ हजार महिलांना शिलाई मशीन वाटपाचा शुभारंभ परभणीतून करण्यात आल्याचेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. दुष्काळाची परिस्थिती लक्षात घेऊन खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मंडळाने यंदा नवरात्रोत्सव साधेपणाने साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. उत्सवातील बचतीतून शेतकऱ्यांना भरीव मदत केली जाणार आहे. इतर मंडळांनीही अशाच प्रकारे काही बचत करून बळीराजाच्या मदतीसाठी पुढे यावे, असे आवाहन शिंदे यांनी केले. "बळीराजाची दिवाळी आम्ही काळी होऊ देणार नाही," असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. स्वर्गीय गुरुवर्य धर्मवीर आनंद दिघे साहेबांच्या प्रेरणेने सुरू झालेल्या टेंभी नाका नवरात्रोत्सवाचे यंदा हे ४८वे वर्ष आहे.

पुण्यानंतर आता मुंबईतही पेटकेअर प्रशिक्षण संस्था?

मुंबई : पुण्यात नुकतीच पेटकेअर एज्युकेशन अँड ट्रेनिंग संस्थेची सुरुवात करण्यात आली असून, याच धर्तीवर मुंबईतही पेटकेअर शिक्षण व प्रशिक्षण संस्था सुरू करण्यासाठी कौशल्य विकास विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी पुढाकार घेतला आहे. यासोबतच राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आयटीआय) पेटकेअरविषयक विशेष अभ्यासक्रम सुरू करण्याचाही मानस असल्याचे त्यांनी सांगितले.

मुंबईत पेटकेअर शिक्षण व प्रशिक्षण संस्था सुरू करण्याच्या दृष्टीने प्राणीप्रेमी आणि नागरिकांकडून सूचना व हरकती मागविण्यात येत आहेत.

सुषमा अंधारेंचं 'ते' वाक्य झोंबलं!

जन सम्राट टाईम्स



ठाणे | प्रतिनिधी: पुण्यातील एस.एम.जोशी पुलाजवळ तब्बल 12 दिवस चाललेल्या एमपीएससी विद्यार्थ्यांचे आंदोलन रविवारी स्थगित करण्यात आले होते. राज्य सरकार आणि आंदोलनकर्ते दोन्ही बाजूंनी एक-एक पाऊल मागे घेत तोडगा काढला होता. एमपीएससी आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार (Vivek Bhimanwar) यांचा राजीनामा घ्यावा, ही आंदोलनकर्त्यांची प्रमुख मागणी होती. मात्र, पेपरफुटीची चौकशी होईपर्यंत विवेक भीमनवार सुट्टीवर राहतील, असे सांगून राज्य सरकारने आंदोनलकर्त्यांची बोळवण केली होती. रोहित पवार यांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले होते. तब्बल 11 दिवस रोहित पवार (Rohit Pawar) एमपीएससीच्या विद्यार्थ्यांसोबत एस.एम.जोशी पुलाजवळ ठाण मांडून होते, रात्रीही ते तिथेच झोपायचे. मात्र, भीमनवारांच्या राजीनाम्याशिवाय रोहित पवार यांनी आंदोलन मागे घेतल्याने ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे (Sushma Andhare) यांनी नाराजी व्यक्त केली होती. आपण युद्धात जिंकलो आणि तहात हरलो, असे वाटत आहे. अध्यक्षांचा राजीनामा ही मागणी होती. या आंदोलनातून हातात काही पडलं नाही, अशी टिप्पणी सुषमा अंधारे यांनी केली होती. सुषमा अंधारे यांची ही टीका रोहित पवार यांच्या चांगलीच जिव्हारी लागल्याने त्यांनी सोमवारी पत्रकार परिषद घेऊन सडेतोड प्रत्युत्तर दिले. रोहित पवार यांनी सुषमा अंधारे यांच्या वक्तव्याचा समाचार घेताना त्यांना खडेबोल सुनावले. मला सुषमा ताईंना आणि लोकांनाही काही गोष्टी सांगायच्या आहेत. तुम्ही एमपीएससी आंदोलनात आलात, व्यासपीठावर आक्रमक बोललात आणि निघून गेलात. जर खऱ्या अर्थाने तुम्हाला विद्यार्थ्यांचा कळवळा होता तर तिकडे बसायला पाहिजे होतं ना तुम्ही, झोपायला पाहिजे होते. तुमचे नेते तिकडे येऊन राहायला पाहिजे होते आणि या मागणीला पुढे घेऊन जायला पाहिजे होते. टीव्हीवर बोलताना तुम्ही काही बोलू शकता. तिथे काय परिस्थिती असते केवढं प्रेशर होतं , 15 जणांवर कारवाई झाली होती, पोलिसांनी आम्हाला सांगितलं होतं, 800 लोकांची नाव आमच्याकडे आहेत, दुसऱ्या दिवशी कारवाई होणार होती, त्यानंतर आणखी 1200 विद्यार्थ्यांवर कारवाई झाली असती कदाचित , ही कारवाई झाली असती तर आम्ही तिथे मात्र पोलिसांच्या गाडीत असतो, फोटो काढले असते, राजकीय फायदा झाला असता आम्हाला, आम्ही राजकीय पोळी भाजू शकलो असतो. अरे पण त्या विद्यार्थ्यांचं नुकसान झालं असतं त्याचं काय? त्यांच्या भवितव्याचं नुकसान करुन आम्ही आमच्या राजकीय पोळी भाजल्या असत्या, हिरो बनलो असतो मार खाऊन, हे आम्हाला पटत नाही. त्यामुळे कुठे ना कुठे आपल्याला विद्यार्थ्यांची भूमिका मांडत असताना काही गोष्टींचा विचार करावा लागतो. यापूर्वीही आंदोलन झाली आहेत. मात्र, मुख्य सचिवाची सही असलेली मागण्या मान्य झाल्याचं पत्र मिळवणे सोपे नसते, असे रोहित पवार यांनी म्हटले.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

पूर्णेकर हत्या प्रकरणात न्यायासाठी आरपारची लढाई

नवरात्रोत्सव संपण्यापूर्वी न्याय न मिळाल्यास राम पूर्णेकर आंदोलनाला बसणार

जन सम्राट टाईम्स

ठाणे । प्रतिनिधी: शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विभागप्रमुख प्रदीप पूर्णेकर यांच्या निर्घृण हत्या प्रकरणात न्याय मिळेपर्यंत लढा सुरूच ठेवणार, असा ठाम निर्धार त्यांचे पुत्र राम पूर्णेकर यांनी व्यक्त केला आहे. नवरात्रोत्सवाचे नऊ दिवस संपण्यापूर्वी न्याय मिळाला नाही, तर उपमुख्यमंत्री तथा ठाण्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाण्यातील खासगी निवासस्थानाबाहेर आंदोलनाला बसणार, असा इशाराही त्यांनी दिला. हत्येमागील सूत्रधारांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, तसेच या प्रकरणाचा तपास सीबीआय आणि सीआयडीमार्फत करावा, अशी मागणी त्यांनी केली. सोमवारी पत्रकारांशी संवाद साधताना राम पूर्णेकर यांनी या प्रकरणाच्या तपासाबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले. शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, खासदार संजय राऊत, मनसे नेते अविनाश जाधव, आगरी समाजबांधव आणि विविध आगरी संघटनांनी कुटुंबाला पाठिंबा दिल्याचे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेण्यासाठी प्रयत्न केले; मात्र अद्याप भेट होऊ शकलेली नाही, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली. दोषींवर कठोर कारवाईची मागणी प्रदीप पूर्णेकर यांच्या हत्या प्रकरणाची चौकशी जलदगतीने पूर्ण करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी अपेक्षा राम पूर्णेकर यांनी व्यक्त केली. भाजपचे नेते, आमदार, माजी



खासदार आणि नगरसेवकांनी त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून अद्याप कोणीही सांत्वनासाठी आले नसल्याचा दावा त्यांनी केला. या प्रकरणात केवळ प्रत्यक्ष गुन्ह्यात सहभागी असलेल्या व्यक्तींवर कारवाई करून चालणार नाही, तर हत्येचा कट कोणी रचला, त्यामागे कोणाचा सहभाग आहे आणि आरोपींना आर्थिक मदत कोणी केली, याचाही सखोल तपास झाला पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली. पाचव्या आरोपीच्या भूमिकेवर संशय या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या पाचव्या आरोपीबाबतही राम पूर्णेकर यांनी प्रश्न उपस्थित केला. संबंधित आरोपीची शरीरयष्टी आणि देहबोली पाहता तो सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसणारा हेल्मेटधारी व्यक्ती असल्याचे वाटत नसल्याचा दावा त्यांनी केला. त्यामुळे सर्व संशयितांची भूमिका स्पष्ट करून हत्येमागील सूत्रधारांचा शोध घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली. हा दावा असून, त्याबाबतची अंतिम स्पष्टता तपासातूनच समोर येणार आहे. दोन आरोपींना १९ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी दरम्यान, प्रदीप पूर्णेकर हत्या प्रकरणात उत्तर प्रदेशातून अटक करण्यात आलेल्या संतोष कनोजिया ऊर्फ टल्ली आणि अमित सिंग ऊर्फ पपलू या दोघांना ठाणे न्यायालयाने १९ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. सोमवारी दोघांना न्यायालयात हजर करण्यात आले होते. ठाणे खंडणीविरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेश साळवी यांनी दोन्ही आरोपींची १४ दिवसांची पोलीस कोठडी मागितली. आरोपींचे मोबाइल फोन आणि गुन्ह्याच्या वेळी वापरलेले कपडे जप्त करणे बाकी असल्याचे पोलिसांनी न्यायालयाला सांगितले. तसेच आरोपींच्या बँक खात्यांतील व्यवहारांची तपासणी करून त्यांना आर्थिक मदत कोणी केली, याचा शोध घेणे आवश्यक असल्याचेही नमूद करण्यात आले. तपासात घटनास्थळावरील हेल्मेटधारी व्यक्ती अमित असल्याची बाब समोर आल्याचे पोलिसांनी न्यायालयात सांगितले. संबंधित हेल्मेट जप्त करणे, हत्येचा कट नेमका कुठे रचण्यात आला याचा शोध घेणे आणि अटकेतील सर्व आरोपींची समोरासमोर चौकशी करणे आवश्यक असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

पाण्यात कर्करोगजन्य क्रोमियमचा गंभीर धोका!

२५ हजार नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर, उद्योगांवर कारवाई सुरू

जन सम्राट टाईम्स

नाशिक। प्रतिनिधी : नाशिकमधील औद्योगिक प्रदूषणाचा प्रश्न आता नागरिकांच्या आरोग्याशी थेट जोडला गेला आहे. अंबड औद्योगिक वसाहतीजवळील दत्तनगर परिसरातील बोअरवेलच्या पाण्याच्या नमुन्यांमध्ये कर्करोगाशी संबंधित गंभीर आरोग्यधोका निर्माण करू शकणाऱ्या क्रोमियम हेक्साव्हॅलेंट या विषारी रसायनाचे प्रमाण निर्धारित मर्यादेपेक्षा सुमारे हजार पट अधिक आढळल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या पाण्यामुळे परिसरातील सुमारे २५ हजार नागरिकांच्या आरोग्याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. पाण्याच्या नमुन्यांचा अहवाल जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर मांडल्याची माहिती आहे. दरम्यान, दूषित पाण्याचे स्रोत शोधून ते रोखण्यासाठी जिल्हा प्रशासन, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने संयुक्त कारवाई सुरू केली आहे. निर्धारित मर्यादा ०.०५; नमुन्यात ५०.३ मिग्रॅ दत्तनगर परिसरात बोअरवेलमधून पिवळसर रंगाचे पाणी येत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या होत्या. या पाण्याच्या संपर्कामुळे काही रहिवाशांना त्वचेचे विकार जाणवत असल्याचेही समोर आले. तक्रारींची गंभीरता लक्षात घेऊन प्रशासनाने पाण्याचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले. प्राप्त अहवालात क्रोमियमचे प्रमाण अत्यंत जास्त असल्याचे नमूद करण्यात आल्याची माहिती आहे. उपलब्ध माहितीनुसार, पाण्यात प्रति लिटर ०.०५ मिलीग्रॅम इतके प्रमाण अपेक्षित असताना नमुन्यात ५०.३ मिलीग्रॅम क्रोमियम आढळल्याचे सांगण्यात आले आहे. हे प्रमाण निर्धारित मर्यादेच्या सुमारे १,००६ पट आहे. त्यामुळे भूजल प्रदूषणाची तीव्रता आणि त्यावर तातडीने नियंत्रण मिळवण्याची गरज अधोरेखित झाली आहे. क्रोमियम हेक्साव्हॅलेंट हे



विषारी रासायनिक संयुग असून, त्याच्या संपर्कामुळे त्वचा आणि श्वसनसंस्थेवर परिणाम होऊ शकतो. दीर्घकाळ किंवा विशिष्ट मार्गाने संपर्क आल्यास कर्करोगाचा धोकाही वाढू शकतो.

मात्र, दत्तनगरमधील प्रत्येक नागरिकाला या पाण्यामुळे कर्करोग झाला आहे किंवा होणार आहे, असा निष्कर्ष केवळ पाण्याच्या नमुन्याच्या अहवालावरून काढता येत नाही. त्यासाठी वैद्यकीय तपासणी, संपर्काचा कालावधी आणि इतर आरोग्यविषयक पुराव्यांचे मूल्यमापन आवश्यक आहे. २५ हजार नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न दत्तनगर परिसरातील सुमारे २५ हजार नागरिकांना दूषित पाण्याचा संभाव्य धोका असल्याचे वृत्त आहे. आतापर्यंत वैद्यकीय तपासणीत १९ रहिवाशांना त्वचेचे विकार आढळल्याची माहिती देण्यात आली आहे. या तक्रारींचे स्वरूप, त्यांचा दूषित पाण्याशी असलेला संभाव्य संबंध आणि इतर कारणे यांची वैद्यकीय पातळीवर तपासणी होणे आवश्यक आहे.

पिण्याच्या पाण्यात विषारी रसायनांचे प्रमाण अधिक आढळणे ही केवळ पर्यावरणीय समस्या नाही, तर सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीनेही गंभीर बाब आहे. परिसरातील नागरिकांना सुरक्षित पाणी उपलब्ध करून देणे, संशयित जलस्रोतांचा वापर थांबवणे आणि प्रभावित नागरिकांची आरोग्य तपासणी करणे यांना प्राधान्य देणे गरजेचे आहे. उद्योगांवर नोटिसा; काही कंपन्या सील दूषित पाण्याचे स्रोत शोधण्यासाठी प्रशासनाने संबंधित यंत्रणांच्या मदतीने कारवाई सुरू केली आहे. काही कंपन्यांना उद्योग बंद ठेवण्यासंदर्भात नोटिसा बजावण्यात आल्याची, तर काही कंपन्या सील करण्यात आल्याची माहिती आहे. प्रदूषणास जबाबदार असलेल्या उद्योगांची संख्या तपासादरम्यान वाढू शकते, असे जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांनी सांगितल्याचे वृत्त आहे. औद्योगिक सांडपाण्यावर योग्य प्रक्रिया न करता त्याचा निचरा केला जात असल्यास भूजल आणि नदीप्रदूषणाचा धोका वाढू शकतो. त्यामुळे संबंधित उद्योगांमधील सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा कार्यरत आहेत का, प्रदूषण नियंत्रणाचे नियम पाळले जातात का आणि दूषित पाणी जमिनीत किंवा जलवाहिन्यांमध्ये मिसळले जात आहे का, याची सखोल तपासणी आवश्यक आहे. अनधिकृत वाहिन्या तोडण्याची शिफारस मुख्यमंत्र्यांसमोर सादर करण्यात आलेल्या अहवालात काही तातडीच्या उपाययोजनांची आवश्यकता अधोरेखित करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. यामध्ये अनधिकृत जलवाहिन्या, सांडपाणी वाहिन्या आणि पावसाळी पाण्याचे नाले तोडण्याच्या सूचनांचा समावेश आहे. या मार्गांचा वापर करून प्रक्रिया न केलेले दूषित पाणी थेट नदीत सोडले जात असल्याची शक्यता अहवालात व्यक्त करण्यात आली आहे.

संपादकीय

जंतर-मंतरवर दडपशाही का?

आंदोलनाला उत्तर लाठी-कडेकोट बंदोबस्त नव्हे, तर संवादाचे; निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेची कसोटी लोकशाहीमध्ये सरकारची ताकद केवळ सत्तेच्या संख्याबळावर, पोलिसांच्या बंदोबस्तावर किंवा विरोधकांना नियंत्रणात ठेवण्याच्या क्षमतेवर मोजली जात नाही.

सरकार किती संयमाने टीका ऐकते, विरोधी मतांना किती अवकाश देते आणि संवैधानिक संस्थांविषयी जनतेच्या मनात निर्माण झालेल्या शंकांचे निरसन किती पारदर्शकपणे करते, यावरही लोकशाहीची गुणवत्ता ठरत असते. राजधानी नवी दिल्लीतील जंतर-मंतर परिसरातील आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर हाच प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सुरू झालेल्या आंदोलनाला उत्तर देताना सरकारने प्रतिबंधात्मक कारवाईचा मार्ग स्वीकारला असेल, तरी या कारवाईची व्याप्ती, तिची आवश्यकता आणि तिचे लोकशाही मूल्यांच्या कसोटीवर होणारे मूल्यमापन टाळता येणार नाही. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीमध्ये मोठ्या प्रमाणावर पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आल्याचे, प्रमुख नेत्यांसह हजारो निदर्शकांना ताब्यात घेण्यात आल्याचे आणि राजधानीकडे येणाऱ्या वाहतुकीवर निर्बंध लादण्यात आल्याचे वृत्त समोर आले. रेल्वेगाड्या रद्द करणे, मेट्रो स्थानके बंद ठेवणे आणि विविध शहरांमध्ये आंदोलकांची धरपकड करणे अशा उपाययोजनांमुळे आंदोलन रोखण्याचा प्रयत्न झाल्याची टीका होत आहे. कायदा-सुव्यवस्था राखणे ही सरकारची जबाबदारी आहे, यात शंका नाही. मात्र, संभाव्य अनुचित प्रकार रोखण्याच्या नावाखाली शांततापूर्ण आंदोलनाचा मार्गच बंद केला जात असेल, तर प्रतिबंधात्मक कारवाई आणि आंदोलन दडपण्यातील सीमारेषा तपासण्याची वेळ येते. लोकशाहीमध्ये सरकारच्या निर्णयांवर प्रश्न उपस्थित करणे, संवैधानिक संस्थांच्या कामकाजाबद्दल शंका व्यक्त करणे आणि त्या शंकांचे निरसन करण्याची मागणी करणे हा नागरिकांचा अधिकार आहे. अर्थात, या अधिकाराचा वापर करताना कायद्याचे पालन करणे आणि सार्वजनिक शांतता राखणे ही आंदोलकांचीही जबाबदारी आहे. परंतु आंदोलन होण्याची शक्यता म्हणजेच कायदा-सुव्यवस्थेला धोका, असे गृहीत धरून व्यापक निर्बंध लादणे योग्य ठरत नाही. जंतर-मंतरवर आंदोलन करण्याची घोषणा आधीच करण्यात आली होती, तर आयोजकांशी चर्चा करून आंदोलनाची जागा, वेळ, सहभागींची संख्या आणि सुरक्षेच्या अटी निश्चित करता आल्या असत्या. एखाद्या आंदोलनामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होण्याची किंवा तणाव वाढण्याची शक्यता असेल, तर त्यावर प्रमाणबद्ध उपाययोजना करता येतात. मात्र, नेत्यांना शहरात दाखल होताच ताब्यात घेणे, निदर्शकांना आंदोलनस्थळी पोहोचण्यापासून रोखणे आणि वाहतुकीवर व्यापक परिणाम करणारे निर्बंध लादणे यामुळे सरकारचा उद्देश कायदा-सुव्यवस्था राखणे होता की विरोधाचा आवाज कमकुवत करणे, असा प्रश्न निर्माण होतो. सरकारने या कारवाईचे समर्थन करायचे असेल, तर त्यामागील ठोस कारणे सार्वजनिक करायला हवीत. कोणता विशिष्ट धोका होता, कोणत्या उपाययोजना आवश्यक होत्या आणि कमी निर्बंधात्मक पर्याय का पुरेसे नव्हते, याचे स्पष्टीकरण दिले गेले पाहिजे. लोकशाहीमध्ये अधिकारांचा वापर जितका महत्त्वाचा, तितकीच त्या अधिकारांच्या वापराबाबतची जबाबदारीही महत्त्वाची असते. या संपूर्ण वादाच्या केंद्रस्थानी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्याविषयी विरोधकांनी उपस्थित केलेले आक्षेप आहेत. मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेत (एसआयआर) अनेक मतदारांची नावे वगळली गेल्याचा मुद्दा विरोधकांनी उपस्थित केला आहे. मतदारांची नावे वगळण्याची प्रक्रिया, तिचे निकष, प्रत्यक्ष पडताळणी आणि संबंधित मतदारांना उपलब्ध असलेली दाद मागण्याची व्यवस्था यांविषयी प्रश्न विचारले जात असतील, तर त्यांची उत्तरे देणे आवश्यक आहे. मतदारयादी ही केवळ प्रशासकीय नोंद नसते; ती लोकशाहीतील नागरिकांच्या राजकीय सहभागाचा पाया असते. एखाद्या पात्र मतदाराचे नाव चुकीने वगळले गेले, तर त्याचा मतदानाच्या अधिकारावर थेट परिणाम होऊ शकतो. त्याचवेळी, मतदारयाद्या अचूक ठेवण्यासाठी पडताळणी करणेही निवडणूक व्यवस्थेची आवश्यक जबाबदारी आहे. त्यामुळे एसआयआरमधील प्रत्येक बदल चुकीचा आहे. प्रत्यक्ष आकडेवारी, निकष आणि तक्रारींच्या निवारणाची माहिती समोर येणे गरजेचे आहे. निवडणूक आयोगासारख्या स्वायत्त संस्थेचे महत्त्व केवळ तिच्या घटनात्मक दर्जात नसते, तर तिच्याविषयी जनतेच्या मनात असलेल्या विश्वासात असते.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

शिकमध्ये महिला चोरट्यांच्या टोळीचा धुमाकूळ!

जन सम्राट टाईम्स

नाशिक | प्रतिनिधी : नाशिक शहरातील सातपूर विभागामध्ये येणाऱ्या विविध परिसरांमध्ये मागील आठ दिवसांपासून महावितरणच्या डीपींमधून (ट्रान्सफॉर्मर) फ्युज चोरीला जाण्याचा अत्यंत गंभीर प्रकार सुरू आहे. यामुळे स्थानिक नागरिकांना तासनतास अंधारात राहावे लागत असून, दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. सातपूर हा प्रमुख औद्योगिक आणि दाट लोकवस्तीचा निवासी भाग असल्याने येथे डीपींची संख्या लक्षणीय आहे. याच बाबीचा गैरफायदा घेत चोरट्या महिलांच्या एका टोळीने दररोज सकाळी किमान १०० लहान-मोठ्या डीपींमधून फ्युज अनधिकृतपणे काढून लंपास करण्याचा धडाका लावला आहे. त्यामुळे परिसरातील विद्युत पुरवठा खंडीत झाल्याने ऐन उन्हाच्या तडाख्यात नागरिकांना वीजपुरवठा खंडित होण्याचे संकट सहन करावे लागत आहे. या गंभीर प्रकाराची दखल घेत महावितरण प्रशासनाने स्थानिक पोलीस ठाण्यांना तातडीने पत्र देऊन चोरट्या महिलांच्या टोळीवर कडक कायदेशीर कारवाई करण्याची विनंती केली आहे. तसेच, नागरिकांना आपल्या परिसरात असे संशयास्पद प्रकार किंवा भंगार गोळा करणाऱ्या महिला डीपीजवळ दिसल्यास त्यांना त्वरित रोखावे, असे आवाहन करण्यात आले आहे. नागरिक अशा संशयितांना पकडून थेट पोलिसांच्या स्वाधीन करू शकतात किंवा महावितरणच्या आणि ७८७५७६६४४६ या हेल्पलाइन क्रमांकांवर संपर्क



साधून तातडीने माहिती द्यावी, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे. महावितरणच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, पथुज चोरीचे हे प्रकार प्रामुख्याने सकाळी घडतात. मात्र, सकाळी नागरिक नौकरी व कामधंद्यानिमित्त घराबाहेर पडलेले असतात, तर काही नागरिक वीज यंत्रणेचे काही दुरुस्ती काम सुरू असावे, या गैरसमजातून त्वरित तक्रार करत नाहीत, परिणामी, सायंकाळी ५ वाजेनंतर नागरिक घरी परतल्यानंतर वीज गेल्याच्या तक्रारीचा महावितरणकडे अचानक ओघ वाढतो. महावितरणकडे असलेल्या अपुऱ्या मनुष्यबळात एकाच वेळी अनेक भागांत नवे फ्युज बसवून वीजपुरवठा पूर्ववत करताना कर्मचाऱ्यांची मोठी कसरत होत असून, यात अनेक तासांचा कालावधी निघून जात आहे.फ्युज चोरीच्या या सत्रामुळे महात्मा नगर, वावरे लेन, अद्वैत कॉलनी, मॉडेल कॉलनी, श्रमिक कॉलनी, उदय नगर, एसटी कॉलनी, माणिक नगर, व्हीसे मळा,परिसर, सावरकर नगर आणि कॉलेज रोड या प्रमुख भागांना मोठा फटका बसला असून, येथे अंधाराचे साम्राज्य पसरत आहे. उन्हाची तीव्रता वाढली असतानाच या घटना वाढल्याने नागरिकांत संताप व्यक्त होत आहे.

दुष्काळाची झळ असह्य; डाळींचे दर कडाडले!

दोन आठवड्यांत खाद्यपदार्थांच्या किमतीत १० ते २० टक्क्यांपर्यंत वाढ

जन सम्राट टाईम्स

नाशिक । प्रतिनिधी : दुष्काळाचे सावट, खरीप पिकांचे नुकसान आणि बाजारातील आवक घटल्याचा फटका आता सर्वसामान्यांच्या स्वयंपाकघराला बसू लागला आहे. साखर, गहू, तांदूळ, डाळींसह अनेक जीवनावश्यक खाद्यपदार्थांच्या किमतीत वाढ झाल्याने महागाईचा तडाखा अधिक तीव्र झाला आहे. गेल्या दोन आठवड्यांत अनेक खाद्यपदार्थांच्या दरात १० ते २० टक्क्यांपर्यंत वाढ झाल्याचे बाजारातील चित्र आहे. दिवाळी अवघ्या काही दिवसांवर आलेली असताना किराणा खरेदीसाठी अधिक पैसे मोजावे लागत असल्याने सर्वसामान्य कुटुंबांचे आर्थिक गणित बिघडले आहे.

दुष्काळाने उत्पन्नाला फटका आणि महागाईने खर्चात वाढ, अशा दुहेरी संकटात नागरिक सापडले आहेत. बाजारातील आवक घटली; दरवाढीचा भडका यंदा पावसाच्या अनियमिततेमुळे आणि काही भागांत पावसाअभावी खरीप पिकांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात येत आहे. उत्पादन घटल्याने बाजारात कृषिमालाची आवक मंदावली असून, त्याचा परिणाम किरकोळ बाजारातील किमतींवर होत आहे.



गेल्या आठवड्यापासून अनेक खाद्यपदार्थांचे दर वाढू लागल्याने रोजच्या जेवणातील भाजी-पोळीपासून वरण-भातापर्यंत सर्वच पदार्थ महागले आहेत. गव्हाच्या विविध प्रकारांच्या किमतीत मोठी तफावत दिसत आहे. शिवर गव्हाचा दर प्रतिकिलो ७० रुपयांपर्यंत पोहोचला असून, इतर प्रकारचे गहू ४५ रुपये किलो दराने विकले जात आहेत. गव्हाच्या दरातील वाढीमुळे घरगुती खर्चासोबतच पिठाच्या गिरण्या आणि बेकरी उत्पादनांच्या खर्चावरही परिणाम होण्याची शक्यता आहे. तांदळाच्या दरात १० रुपयांची वाढ तांदळाच्या किमतीतही गेल्या पंधरा दिवसांत प्रतिकिलो सुमारे १० रुपयांनी वाढ झाल्याचे बाजारातील व्यापाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे. साध्या तांदळाचा दर ६० ते ७० रुपये किलोपर्यंत पोहोचला आहे. पावसाच्या कमतरतेमुळे तांदळाच्या उत्पादनावर परिणाम झाल्याने बाजारातील आवक घटल्याचे दरवाढीमागील प्रमुख कारण सांगितले जात आहे. दुसरीकडे, उपवासाच्या पदार्थांना मागणी वाढल्याने काळ्या खजुराची आवक कमी झाली आहे. त्यामुळे त्याचा दर प्रतिकिलो ८०० रुपयांपर्यंत पोहोचल्याचे वृत्त आहे. सणासुदीच्या काळात मागणी वाढत असताना पुरवठा मर्यादित राहिल्यास ग्राहकांना अधिक किंमत मोजावी लागू शकते. साखर पुन्हा कडू; किलोमागे तीन ते पाच रुपयांची वाढ साखरेच्या दरातील चढ-उतारामुळे ग्राहकांच्या खर्चात आणखी भर पडली आहे. ऑगस्ट महिन्याच्या अखेरीस साखरेचे दर प्रतिकिलो ७२ रुपयांपर्यंत पोहोचले होते. त्यानंतर सरकारी हस्तक्षेपामुळे दर कमी होऊन ५२ ते ५५ रुपये किलोपर्यंत आले होते.

मात्र, यंदा साखरेचे उत्पादन घटण्याचा अंदाज व्यक्त होत असल्याने या आठवड्यात पुन्हा प्रतिकिलो तीन ते पाच रुपयांची वाढ झाली आहे. सध्या साखर ५७ ते ५८ रुपये किलो दराने विकली जात असल्याचे सांगण्यात येत आहे. गुळाचे दर सध्या स्थिर असले, तरी दिवाळीच्या काळात मागणी वाढल्यास त्याच्या किमतीतही वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सणासुदीच्या फराळासाठी साखर, गूळ, रवा, बेसन आणि खाद्यतेलाची खरेदी वाढत असल्याने दरवाढीचा परिणाम थेट घरगुती बजेटवर होणार आहे. डाळींच्या दरात तेजी; तूरडाळ १८० रुपयांवर सर्वसामान्यांच्या रोजच्या आहारातील डाळीही महागल्या आहेत. तूर, चणा, मटकी, मूग आणि मसूर या डाळींच्या दरात गेल्या आठवड्यापासून प्रतिकिलो ५ ते ३० रुपयांपर्यंत वाढ झाल्याचे उपलब्ध दरांवरून दिसते. विदर्भ आणि मराठवाड्यातील प्रमुख डाळ उत्पादक भागांत पावसाअभावी उत्पादन आणि आवकेवर परिणाम झाल्याचे सांगितले जात आहे. या दरांनुसार तूरडाळीच्या किमतीत प्रतिकिलो १० ते २० रुपये, चणाडाळीत १२ ते २२ रुपये, तर मटकीच्या दरात २० ते ३० रुपयांची वाढ झाली आहे.

परिणामी, रोजच्या जेवणात डाळींचा वापर करणाऱ्या कुटुंबांना आता खरेदीचे प्रमाण कमी करावे लागण्याची शक्यता आहे. तीळ, बेसन आणि रव्याचे दरही वाढले दिवाळीच्या फराळासाठी वापरल्या जाणाऱ्या पदार्थांच्या किमतीतही वाढ होत आहे. तिळाचे दर प्रतिकिलो १६५ रुपयांपर्यंत पोहोचल्याचे सांगण्यात येत असून, आगामी काळात ते २०० रुपयांपर्यंत जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. बेसन पीठ १३० रुपये किलो, तर रवा ५२ ते ५५ रुपये किलो दराने विकला जात आहे.

पुन्हा २४ तास शटडाऊन ;काटकसरीचा दिला सल्ला; मनपा-ओसीडब्ल्यूचे अपयश

जन सम्राट टाईम्स

नागपूर | प्रतिनिधी : नागपूर शहरातील अनेक भागांत अनियमित आणि अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. एकीकडे नळाला पाणी येण्याची शाश्वती नसताना दुसरीकडे महापालिका आणि ओसीडब्ल्यूकडून पाणी काटकसरीने वापरण्याचे आवाहन केले जात आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्याची जबाबदारी असलेल्या यंत्रणांनी वारंवार होणाऱ्या गळती, दुरुस्ती आणि शटडाऊनच्या समस्यांवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याऐवजी नागरिकांनाच काटकसरीचे सल्ले देणे कितपत योग्य, असा सवाल उपस्थित होत आहे. मानकापूर चौकाजवळील पेंच-४ जलवाहिनीच्या गळती दुरुस्तीसाठी मंगळवारी पुन्हा २४ तासांचा पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार असल्याने नागरिकांच्या अडचणी आणखी वाढणार आहेत.शहरातील पाणीपुरवठा यंत्रणेतील त्रुटींचा फटका वारंवार नागरिकांना सहन करावा लागत आहे. कधी जलवाहिनीची गळती, कधी तांत्रिक बिघाड, तर कधी देखभाल-दुरुस्तीच्या नावाखाली पाणीपुरवठा बंद केला जातो. ही कामे आवश्यक असली तरी त्यांचे योग्य नियोजन करणे ही महापालिका आणि ओसीडब्ल्यूची जबाबदारी आहे. प्रत्येक वेळी शटडाऊन जाहीर करून नागरिकांना पाणी साठवण्याचे आणि काटकसरीने वापरण्याचे आवाहन केले जाते. मात्र, अनेक भागांत आधीच पुरेसे पाणी मिळत नसताना अशा सूचनांचा उपयोग काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे. नागरिकांना नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा मिळणे अपेक्षित असताना त्यांनाच वारंवार गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे तात्पुरत्या दुरुस्त्यांऐवजी पाणीपुरवठा यंत्रणेतील त्रुटी दूर करून कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज आहे. उन्हाळ्यात पाण्याची मागणी वाढणार, जलसंतांवरील ताण वाढणार आणि त्याचवेळी जलवाहिन्यांच्या दुरुस्तीची कामे सुरू राहणार असतील तर नागपूरकरांना पुन्हा मोठ्या पाणीबाणीला सामोरे जावे लागू शकते, मनपा आणि ओसीडब्ल्यूने आता केवळ शटडाऊनच्या सूचना आणि काटकसरीचे सल्ले देण्यापलीकडे जाऊन पाणीपुरवठा यंत्रणेतील त्रुटी कायमस्वरूपी दूर करण्यावर भर देण्याची गरज आहे.

षधाच्या किमतीमागे मार्जिनची साखळी कार्यरत!

सीसीआयच्या अभ्यासातून उलगडा; उत्पादकापासून मेडिकलच्या काउंटरपर्यंत टप्पे

जन सम्राट टाईम्स

मुंबई। प्रतिनिधी : औषध दुकानांच्या काउंटरवर औषधांच्या पाकिटावरील एमआरपी पाहून रुग्ण पैसे मोजतो. मात्र या अंतिम किमतीमागे केवळ औषधनिर्मितीचा खर्च नसतो. उत्पादकापासून स्टॉकिस्ट, घाऊक विक्रेता आणि किरकोळ विक्रेत्यापर्यंतच्या वितरण साखळीतील विविध टप्प्यांवरील व्यापार मार्जिनचाही औषधाच्या अंतिम किमतीवर परिणाम होतो. सीसीआय म्हणजेच भारतीय प्रतिस्पर्धा आयोगाच्या औषध क्षेत्रावरील अभ्यासातून ही किंमत-साखळी स्पष्ट होते. मात्र औषध कंपन्यांच्या माहितीनुसार हे मार्जिन शेवटच्या टप्प्या पर्यंत टिकत नसून हे मार्जिन वाढतेच, असेही स्पष्ट होत असून त्यामुळे प्रत्यक्ष औषध दरात वाढ दिसून येतेसीसीआयच्या 'मार्केट स्टडी ऑन द फार्मासिटिकल सेक्टर इन इंडिया' या अभ्यासात उत्पादकाची किंमत, वितरणातील मार्जिन, घाऊक व किरकोळ मार्जिन आणि कर अशा विविध 'प्राइस पॉईंट्स'चा अभ्यास करण्यात आला.

त्यामुळे पाकिटावरील औषधाची किंमत म्हणजे थेट उत्पादन खर्च नव्हे, हे स्पष्ट होत आहे.औषधांच्या



व्यापारातील साखळी साधारणपणे कंपनी ते स्टॉकिस्ट ते रिटेलर ते रुग्ण अशी असते, कंपनीकडून स्टॉकिस्टला मिळणारी किंमत, तर स्टॉकिस्टकडून किरकोळ विक्रेत्याला मिळणारी किंमत म्हणून ओळखली जाते. त्यानंतर ग्राहकासाठी एमआरपी निश्चित केली जाते. सीसीआयच्या अभ्यासानुसार, औषध किंमत नियंत्रण आदेशच्या कक्षेतील शेड्युल औषधांसाठी वैधानिक व्यापार मार्जिन २४% असून त्यात किरकोळ विक्रेत्याचा १६ टक्के आणि घाऊक विक्रेत्याचा ८ टक्के हिस्सा आहे. नॉन-शेड्युल औषधांसाठी मर्यादा नसल्याने घाऊक पातळीवर १०% आणि किरकोळ पातळीवर २०% मार्जिनची रचना वापरतात.८८ काही कंपन्या एमआरपी ठरवताना उत्पादन खर्चाबरोबरच वीजबिल, कर्मचारी वेतन आणि इतर व्यवस्थापकीय खर्चाचाही विचार करतात, उत्पादक, स्टॉकिस्ट, वितरक आणि किरकोळ विक्रेता अशा विविध स्तरांवर मार्जिन असते. ग्राहक मेडिकलमध्ये सवलत मागतो; मात्र ही सवलत नेमकी कोणाच्या मार्जिनमधून दिली जाते, हा महत्वाचा प्रश्न आहे, अशी माहिती एस. चंद्रशेखर, राष्ट्रीय विक्री विभाग, अर्जेनिक्स हेल्थ केअर प्रा. लि.यांनी दिली आहे. औषध दुकानांच्या काउंटरवर औषधांच्या पाकिटावरील एमआरपी पाहून रुग्ण पैसे मोजतो. मात्र या अंतिम किमतीमागे केवळ औषधनिर्मितीचा खर्च नसतो. उत्पादकापासून स्टॉकिस्ट, घाऊक विक्रेता आणि किरकोळ विक्रेत्यापर्यंतच्या वितरण साखळीतील विविध टप्प्यांवरील व्यापार मार्जिनचाही औषधाच्या अंतिम किमतीवर परिणाम होतो. सीसीआय म्हणजेच भारतीय प्रतिस्पर्धा आयोगाच्या औषध क्षेत्रावरील अभ्यासातून ही किंमत-साखळी स्पष्ट होते. मात्र औषध कंपन्यांच्या माहितीनुसार हे मार्जिन शेवटच्या टप्प्या पर्यंत टिकत नसून हे मार्जिन वाढतेच, असेही स्पष्ट होत असून त्यामुळे प्रत्यक्ष औषध दरात वाढ दिसून येतेसीसीआयच्या 'मार्केट स्टडी ऑन द फार्मासिटिकल या अभ्यासात उत्पादकाची किंमत, वितरणातील मार्जिन, घाऊक व किरकोळ मार्जिन आणि कर अशा विविध 'प्राइस पॉईंट्स'चा अभ्यास करण्यात आला.

पुण्यात अखेर पाणी कपात होणार

जन सम्राट टाईम्स

पुणे | प्रतिनिधी : दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने काढलेल्या आदेशानुसार महापालिकेने येत्या गुरुवारपासून (ता.15) आठवड्यातून एक दिवस पाणी पुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भात नियमावली लागू केली आहे. जलसंपदा विभागाने शहराच्या पाणी पुरवठ्यात 40 टक्के कपात करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र, एवढ्या मोठ्या प्रमाणात कपात केल्यास पाणी टंचाई निर्माण होऊ शकते. त्यामुळे महापालिकेने आठवड्यातून एक दिवस पाणी पुरवठा बंद ठेवण्याचे ठरवले आहे.

राज्यात दुष्काळ जाहीर केला गेला आहे. यापार्श्वभूमीवर राज्य सरकारने पाणी पुरवठ्याचे नियोजन करण्यासाठी अध्यादेश जारी केला आहे. या अध्यादेशाची प्रत महापालिका प्रशासनाला नुकतीच प्राप्त झाली. या अध्यादेशानुसार सोमवारी महापालिका अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर, पाणी पुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप आदी अधिकाऱ्यांची बैठक झाली. या बैठकीत प्रामुख्याने खडकवासला धरणसाखळीतील पाण्याचा उपलब्ध साठा, पुण्याची पाण्याची गरज, पाणी बचत, गळती आदीसंदर्भात चर्चा झाली.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

आनंदवार्ता! धम्मचक्र प्रवर्तन दिनासाठी रेल्वेचा विशेष दिलासा!

नागपूरसाठी अनारक्षित गाड्यांची घोषणा;मुंबई, पुणे, नाशिक, सोलापूर, अकोला आणि भुसावळहून विशेष रेल्वेगाड्या

जन सम्राट टाईम्स

धरणगाव। प्रतिनिधी: नागपूर येथील ऐतिहासिक दीक्षाभूमीवर अभिवादन करण्यासाठी जाणाऱ्या अनुयायांसाठी आनंदाची बातमी आहे. या काळात रेल्वे प्रवाशांची होणारी अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने मुंबई, पुणे, नाशिकरोड, सोलापूर, अकोला आणि भुसावळ येथून नागपूरसाठी विशेष रेल्वेगाड्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे. बहुतांश गाड्या अनारक्षित स्वरूपात धावणार असल्याने प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. काही गाड्यांमध्ये आरक्षित आणि अनारक्षित डबे उपलब्ध राहणार आहेत. धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दरवर्षी नागपूरच्या दीक्षाभूमीवर देशभरातून लाखो अनुयायी दाखल होतात. त्यामुळे रेल्वेगाड्यांमध्ये मोठी गर्दी होते. प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी विशेष गाड्यांची व्यवस्था करण्यात आली असून, जळगाव, भुसावळ, पाचोरा, चाळीसगाव, मनमाड, अकोला आणि विदर्भातील विविध स्थानकांवर थांबे देण्यात आले आहेत. पुणे–नागपूर विशेष गाडीच्या चार फेऱ्या गाडी क्रमांक ०१२१५ पुणे येथून १९ आणि २१ ऑक्टोबर रोजी दुपारी २.५० वाजता सुटून दुसऱ्या दिवशी सकाळी ७.३० वाजता नागपूरला पोहोचेल. परतीची गाडी क्रमांक ०१२१६ नागपूर येथून २० आणि २२ ऑक्टोबर रोजी रात्री ११ वाजता सुटून दुसऱ्या दिवशी दुपारी ४.२० वाजता पुण्याला पोहोचेल. या गाडीला दौंड कॉर्ड लाईन, अहिल्यानगर, बेलापूर, कोपरगाव, मनमाड, चाळीसगाव, पाचोरा, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, धामणगाव, पुलगाव, वर्धा आणि अजनी येथे थांबे असतील. नाशिकरोड–नागपूर विशेष मेमू गाडी क्रमांक ०१२१७ नाशिकरोड येथून १८ आणि २० ऑक्टोबर



रोजी सायंकाळी ६ वाजता सुटून दुसऱ्या दिवशी पहाटे ५ वाजता नागपूरला पोहोचेल. परतीची गाडी क्रमांक ०१२१८ नागपूर येथून १९ आणि २१ ऑक्टोबर रोजी रात्री १० वाजता सुटून दुसऱ्या दिवशी सकाळी १०.२० वाजता नाशिकरोडला पोहोचेल. या गाडीला मनमाड, चाळीसगाव, पाचोरा, जळगाव, भुसावळ, मलकापूर, नांदुरा, शेगाव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, धामणगाव, पुलगाव, वर्धा आणि अजनी येथे थांबे राहतील. मुंबई–नागपूर विशेष गाड्यांचीही सोय गाडी क्रमांक ०१००१९ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथून १९ आणि २१ ऑक्टोबर रोजी दुपारी २.३० वाजता सुटून दुसऱ्या दिवशी सकाळी ६.१० वाजता नागपूरला पोहोचेल. परतीची गाडी क्रमांक ०१०२० नागपूर येथून २० आणि २२ ऑक्टोबर रोजी रात्री १०.३० वाजता सुटून दुसऱ्या दिवशी सायंकाळी ५.२० वाजता मुंबईला पोहोचेल. याशिवाय, मुंबई–नागपूर मार्गावर १८ आणि १९ ऑक्टोबरसाठी अनुक्रमे आणखी विशेष फेऱ्यांचे वेळापत्रकही देण्यात आले आहे. या गाड्यांना दादर, ठाणे, कल्याण, इगतपुरी, नाशिकरोड, मनमाड, चाळीसगाव, पाचोरा, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, धामणगाव, पुलगाव, वर्धा आणि अजनी येथे थांबे असतील. या अतिरिक्त फेऱ्यांचे गाडी क्रमांक आणि वेळा प्रवाशांनी अधिकृत रेल्वे वेळापत्रकातून पडताळून घ्याव्यात. नागपूर–अकोला मार्गावर आरक्षित व अनारक्षित गाडी गाडी क्रमांक ०११३१ नागपूर येथून २० आणि २१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.४० वाजता सुटून त्याच दिवशी रात्री ११.३० वाजता अकोल्याला पोहोचेल. परतीची गाडी क्रमांक ०११३२ अकोला येथून २१ आणि २२ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री १२.२० वाजता सुटून त्याच दिवशी पहाटे ४.५० वाजता नागपूरला पोहोचेल. या गाडीला अजनी, वर्धा, पुलगाव, धामणगाव, बडनेरा आणि मूर्तिजापूर येथे थांबे असतील. गाडीमध्ये एक वातानुकूलित द्वितीय श्रेणी, तीन वातानुकूलित तृतीय श्रेणी, सात शयनयान, पाच सामान्य द्वितीय श्रेणीचे डबे आणि गार्ड ब्रेक व्हॅनसह दोन द्वितीय श्रेणी आसनव्यवस्थेचे डबे असल्याची माहिती देण्यात आली आहे. भुसावळ व सोलापूरहूनही विशेष गाड्या गाडी क्रमांक ०१२१३ भुसावळ येथून २१ आणि २२ ऑक्टोबर रोजी सकाळी ५ वाजता सुटून त्याच दिवशी दुपारी १२.२० वाजता नागपूरला पोहोचेल. परतीची गाडी क्रमांक ०१२१४ नागपूर येथून २० आणि २१ ऑक्टोबर रोजी रात्री ९.३० वाजता सुटून दुसऱ्या दिवशी पहाटे ४ वाजता भुसावळला पोहोचेल. सोलापूर–नागपूर मार्गावर गाडी क्रमांक ०१०२९ सोलापूर येथून १९ ऑक्टोबर रोजी सकाळी ९.५० वाजता सुटून दुसऱ्या दिवशी पहाटे ५.१० वाजता नागपूरला पोहोचेल. परतीची गाडी क्रमांक ०१०३० नागपूर येथून २० ऑक्टोबर रोजी रात्री ११.३० वाजता सुटून दुसऱ्या दिवशी रात्री ११.४५ वाजता सोलापूरला पोहोचेल. धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त नागपूर येथील ऐतिहासिक दीक्षाभूमीवर अभिवादन करण्यासाठी जाणाऱ्या अनुयायांसाठी आनंदाची बातमी आहे. या काळात रेल्वे प्रवाशांची होणारी अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने मुंबई, पुणे, नाशिकरोड, सोलापूर, अकोला आणि भुसावळ येथून नागपूरसाठी विशेष रेल्वेगाड्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे. बहुतांश गाड्या अनारक्षित स्वरूपात धावणार असल्याने प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. काही गाड्यांमध्ये आरक्षित आणि अनारक्षित डबे उपलब्ध राहणार आहेत. धम्मचक्र प्रवर्तन दिनासाठी नागपूरला जाणाऱ्या अनुयायांना या विशेष गाड्यांचा लाभ घेता येणार आहे. प्रवासाचे नियोजन करण्यापूर्वी प्रवाशांनी गाडी क्रमांक, प्रवासाची तारीख, थांबे आणि आरक्षण किंवा अनारक्षित प्रवासाची स्थिती यांची अधिकृत रेल्वे स्रोतांवरून खात्री करावी.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

नियम मोडला की दणका बसणारच!

जन सम्राट टाईम्स



धुळे । प्रतिनिधी : :राज्यात आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांची अन्न व औषध विभागाच्या आयुक्तपदी वर्णी लागल्यानंतर राज्यात भेसळखोरांवर कडक कारवाई केली जात आहे. तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वात एफडीएस राज्यभरात धडक कारवाया करत आहे. सणासुदीच्या पार्श्वभूमीवर ग्राहकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या आस्थापनांवर अन्न व औषध प्रशासनाने अत्यंत आक्रमक पावले उचलली आहेत. मुंबईत देखील एफडीएने अशी धडक कारवाई केली आहे.

महाराष्ट्र एफडीएने गंभीर स्वरूपाच्या स्वच्छता आणि सुरक्षेच्या त्रुटी आढळल्यामुळे भांडुप येथील क्विक कॉमर्स कंपनी 'झेप्टो'च्या अन्न व्यवसाय परवाना तसेच मालाड पश्चिम येथील प्रसिद्ध 'ब्रीजवासी' अन्न व्यवसाय परवाना तसेच मालाड पश्चिम येथील प्रसिद्ध 'ब्रीजवासी' आस्थापनाचा एफएसएसएआय परवाना निलंबित केला आहे. अन्न व औषध प्रशासनाकडून सध्या राज्यभरात सणासुदीच्या कालावधीत अन्न सुरक्षेची विशेष मोहीम राबवली जात आहे. त्या अंतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे.संबंधित अन्न साठवणूक आणि वितरण केंद्रांमध्ये आरोग्याला बाधक ठरतील अशी परिस्थिती आढळून आली. अन्नपदार्थांच्या सुरक्षित हाताळणी, साठवणूक आणि अनेक नियमांकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून आले. नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण करू शकणाऱ्या त्रुटी आढळल्यामुळे ही कारवाई करण्यात आली आहे.:

राज्यात आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांची अन्न व औषध विभागाच्या आयुक्तपदी वर्णी लागल्यानंतर राज्यात भेसळखोरांवर कडक कारवाई केली जात आहे. तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वात एफडीएस राज्यभरात धडक कारवाया करत आहे. सणासुदीच्या पार्श्वभूमीवर ग्राहकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या आस्थापनांवर अन्न व औषध प्रशासनाने अत्यंत आक्रमक पावले उचलली आहेत. मुंबईत देखील एफडीएने अशी धडक कारवाई केली आहे.

महाराष्ट्र एफडीएने गंभीर स्वरूपाच्या स्वच्छता आणि सुरक्षेच्या त्रुटी आढळल्यामुळे भांडुप येथील क्विक कॉमर्स कंपनी 'झेप्टो'च्या अन्न व्यवसाय परवाना तसेच मालाड पश्चिम येथील प्रसिद्ध 'ब्रीजवासी' अन्न व्यवसाय परवाना तसेच मालाड पश्चिम येथील प्रसिद्ध 'ब्रीजवासी' आस्थापनाचा एफएसएसएआय परवाना निलंबित केला आहे. अन्न व औषध प्रशासनाकडून सध्या राज्यभरात सणासुदीच्या कालावधीत अन्न सुरक्षेची विशेष मोहीम राबवली जात आहे. त्या अंतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे.संबंधित अन्न साठवणूक आणि वितरण केंद्रांमध्ये आरोग्याला बाधक ठरतील अशी परिस्थिती आढळून आली.

पहूर-शेंदुर्णी मार्गावर भीषण अपघात; सासू-जावयाचा जागीच मृत्यू

घोडेश्वर बाबा मोरीजवळ छोटा हत्ती पिकअपची दुचाकीला धडक

जन सम्राट टाईम्स



पहूर । प्रतिनिधी जामनेर तालुक्यातील पहूर-शेंदुर्णी मार्गावर घोडेश्वर बाबा मोरीजवळ सोमवारी (दि. १२ ऑक्टोबर) दुपारी भरधाव छोटा हत्ती पिकअप वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात सासू आणि जावयाचा मृत्यू झाला. राजू बाबुलाल परदेशी (वय ५६, रा. सातगाव डोंगरी, ता. पाचोरा) आणि विमलबाई ओंकार परदेशी (वय ७०, रा. गोंडखेल, ता. जामनेर) अशी मृतांची नावे आहेत. या दुर्दैवी घटनेमुळे सातगाव डोंगरी, गोंडखेलसह परिसरात शोककळा पसरली आहे. सासूबाईंना गावी सोडण्यासाठी निघाले अन् काळाचा घाला मिळालेल्या माहितीनुसार, सातगाव डोंगरी येथील राजू बाबुलाल परदेशी यांच्या घरी एका कार्यक्रमानिमित्त त्यांच्या सासूबाई विमलबाई परदेशी आल्या होत्या. कार्यक्रम आटोपल्यानंतर त्यांना त्यांच्या मूळ गावी गोंडखेल येथे सोडण्यासाठी राजू परदेशी हे पल्सर दुचाकीने निघाले होते. एमएच १९ ईएच ०४९९ क्रमांकाच्या दुचाकीने ते पहूरमार्गे जात असताना घोडेश्वर बाबा मोरीजवळ हा अपघात घडला. यावेळी समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या छोटा हत्ती पिकअप वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, राजू परदेशी आणि विमलबाई परदेशी गंभीर जखमी होऊन रस्त्यावर कोसळले. सासूबाईंना गावी सोडण्यासाठी निघालेला प्रवास दोघांच्याही मृत्यूने शोकांत ठरला. रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच मृत्यू अपघात घडताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना मदत केली. दोघांनाही तातडीने पहूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप पाटील यांनी तपासणीनंतर दोघांनाही मृत घोषित केले. त्यानंतर ग्रामीण रुग्णालयात दोन्ही मृतदेहांचे शवविच्छेदन करण्यात आले. या घटनेची माहिती मिळताच नातेवाइकांसह परिसरातील नागरिकांमध्ये शोक व्यक्त करण्यात आला. एकाच अपघातात कुटुंबातील दोन जवळच्या व्यक्तींचा मृत्यू झाल्याने दोन्ही कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. गोंडखेल आणि सातगाव डोंगरी येथे अंत्यसंस्कार विमलबाई परदेशी यांच्यावर सोमवारी सायंकाळी सात वाजता त्यांच्या मूळ गावी गोंडखेल येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

बनावट मतदान कार्ड अन् बँक खाते; शेतजमीन हडपण्याचा कथित डाव उघड!

जन सम्राट टाईम्स



चाळीसगाव । (प्रतिनिधी): बनावट ओळखपत्रे तयार करून आणि बनावट बँक खाते उघडून शेतजमिनीच्या व्यवहारातून फसवणूक करण्याचा कथित प्रयत्न चाळीसगाव शहर पोलिसांनी उघडकीस आणला आहे. फिर्यादी शुभम दिलीपराव देशमुख यांच्या नावाने बनावट पॅनकार्ड, मतदान कार्ड आणि आधारकार्ड तयार करून शिववाडी शिवारातील गट क्रमांक २२६/३ मधील २ हेक्टर ८० आर शेतजमिनीच्या व्यवहारात फसवणूक करण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप आहे. या प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे जमिनीचा व्यवहार पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणी चाळीसगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ४९६/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३१८(२), ३१८(४), ३३५, ३३६, ३४०, ६१ आणि ३१९(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींनी फिर्यादी शुभम देशमुख यांच्या नावाने बनावट पॅनकार्ड, मतदान कार्ड आणि आधारकार्ड तयार केल्याचा आरोप आहे. तसेच त्यांच्या नावाशी संबंधित बनावट बँक खाते उघडून त्याचा वापर शेतजमिनीच्या व्यवहारासाठी केल्याचा संशय तपासात व्यक्त करण्यात आला आहे. शिववाडी शिवारातील गट क्रमांक २२६/३ मधील २ हेक्टर ८० आर जमिनीच्या व्यवहारातून फसवणूक करण्याचा कथित प्रयत्न झाल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. दोघांना अटक; दोन दिवसांची पोलीस कोठडी या प्रकरणी नकुल राजू खरात (रा. पंचशील नगर, चाळीसगाव) आणि प्रशांत रमेश निकम (रा. हिरापूर रोड, सुयश लॉन्सच्या पाठीमागे, चाळीसगाव, जि. जळगाव) या दोघांना पोलिसांनी अटक केली आहे. त्यांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी मंजूर केली. बनावट कागदपत्रांची साखळी तपासाच्या केंद्रस्थानी बनावट ओळखपत्रे कोणी तयार केली, बँक खाते उघडण्यासाठी कोणती कागदपत्रे वापरण्यात आली आणि शेतजमिनीच्या व्यवहारामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास पोलीस करीत आहेत. जमिनीच्या मालकीसंबंधीची कागदपत्रे, ओळखपत्रे आणि बँक खात्यांतील व्यवहारांची पडताळणी या तपासात महत्त्वाची ठरणार आहे. पोलीस निरीक्षक अमितकुमार मनेळ यांच्या मार्गदर्शनाखाली तपास या गुन्ह्याची माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना देण्यात आली आहे.

भक्तीचा उत्सव! बिग एफएम आणि 'लालबागचा राजा' यांची अनोखी परंपरा कायम

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: 'लालबागच्या राजा'सोबतच्या सहयोगाला १८ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने बिग एफएमने दीर्घकाळ सुरू असलेल्या त्याच्या गणेशोत्सवाच्या आणखी एका आवृत्तीचा समारोप केला आहे. या एफएम केंद्राने प्रत्यक्ष ठिकाणाहून थेट प्रक्षेपण, अस्सल कथाकथन आणि डिजिटल एगेंजमेंटच्या माध्यमातून त्याचा नियमित स्टुडियो उत्सवाच्या केंद्रभागी आणला. या वर्षीच्या उत्सवाला उबेरने पाठबळ देऊन बिग एफएमच्या 'लालबागचा राजा' मोहिमेला त्याच्या गतिशीलतेची जोड दिली. उबेर आणि सिट्रोएन ही ड्रायव्हिंग पार्टनर म्हणून समाविष्ट झाली, तिने ऑन-ग्राउंड अनुभवाला आराम-केंद्रित घटकाची जोड दिली.

या १० दिवसांच्या उत्सवात उबेरने तिच्या सर्व मोबिलिटी फ्लीटमध्ये वापरकर्त्यांसाठी प्रथमच पहिली राईड मोफत हा उपक्रम



राबविला. तसेच या सहयोगातून १० विजेत्यांना लालबागचा राजाच्या विशेष व्हीआयपी दर्शनाची संधीही मिळाली. या उपक्रमाला बिग एफएमचे रेडिओ आणि सोशल प्लॅटफॉर्म तसेच उबरच्या ऑन-ग्राउंड उपस्थितीतून पाठबळ देण्यात आले. यामध्ये ब्रँडेड टचपॉइंट्स आणि दर्शन घेऊन परतणाऱ्या भाविकांसाठी वेटिंग लाउंजचा समावेश आहे. सिट्रोएनच्या ऑन-ग्राउंड उपस्थितीमध्ये कार शोकेस आणि मसाज चेअर्ससह समर्पित कम्फर्ट झोन होते. त्यामुळे भाविकांना दर्शनानंतर विश्रांती घेण्यासाठी जागा उपलब्ध करण्यात आली. लालबाग येथून बिग एफएमच्या लाइव्ह स्टुडिओचे स्थानांतर हे या वर्षीच्या क्रियाशीलतेच्या केंद्रस्थानी होते. त्यामुळे हे केंद्र लोकांच्या अधिक जवळ आले आणि महोत्सवाला आकार देणारे क्षण टिपण्यात आले. या स्टुडिओमध्ये थेट आरती कव्हरेज, मूर्तीचे अनावरण, सेलिब्रिटी आणि भक्तांशी संभाषणे, उत्सवाचे अपडेट्स आणि विसर्जन कव्हरेज ही विशेष आकर्षणे होती. तर लालबागला प्रवास करू न शकणाऱ्यांपर्यंत हा अनुभव बिग एफएमच्या डिजिटल प्लॅटफॉर्मने पोहोचविला.

बोदवड येथे भव्य 10 दिवसीय श्रामणेर-बौद्धाचार्य प्रशिक्षण शिबिराचा उत्साहात

तक्षशिला बुद्धविहारात धम्मवंदना व महामानवांच्या पूजनाने उद्घाटन

जन सम्राट टाईम्स

बोदवड । प्रतिनिधी: सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौद्ध महासभा, संस्थापक अध्यक्ष बोधिसत्त्व परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणित, जिल्हा शाखा जळगाव पूर्व अंतर्गत तालुका शाखा बोदवड यांच्या वतीने आयोजित भव्य १० दिवसीय श्रामणेर-बौद्धाचार्य प्रशिक्षण शिबिराचा शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात झाला. रविवार, दि. ११ ऑक्टोबर २०२६ रोजी तक्षशिला बुद्धविहार, साकला कॉलनी, बोदवड येथे उद्घाटन सोहळा पार पडला. दि. ११ ते २० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत चालणाऱ्या या शिबिराच्या उद्घाटनाची सुरुवात श्रामणेर संघाचे उपाध्याय पूज्य भंते राज ज्योती, अकोला यांच्या हस्ते महामानवांच्या पूजनाने आणि धम्मवंदनेने करण्यात आली. या शिबिराच्या माध्यमातून बौद्ध धम्माचे संस्कार, श्रामणेर प्रशिक्षण आणि बौद्धाचार्यांच्या कर्तव्यांविषयी सखोल मार्गदर्शन करण्यात येणार आहे. मान्यवरांच्या उद्घाटन सोहळा कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बोदवड तालुकाध्यक्ष आदरणीय शांताराम मोरे गुरुजी होते. प्रमुख मार्गदर्शक व दहा दिवसीय केंद्रीय शिक्षक म्हणून भारतीय बौद्ध महासभेचे महाराष्ट्र राज्य संस्कार उपाध्यक्ष आदरणीय विजय कांबळे गुरुजी उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून जिल्हाध्यक्ष आदरणीय सुमंगल



तथा रविंद्र अहिरे गुरुजी उपस्थित होते. पुष्पपूजेसाठी महाराष्ट्र राज्य सचिव डॉ. के. वाय. सुरवाडे गुरुजी आणि जिल्हा उपाध्यक्ष, संस्कार विभागाचे आदरणीय रविंद्र वानखेडे उपस्थित होते. दीपपूजेचा मान जिल्हा सरचिटणीस आदरणीय सुशील कुमार हिवाळे आणि जिल्हा कोषाध्यक्ष प्रा. डॉ. संजीव सावळे गुरुजी यांना मिळाला. धूपपूजेसाठी आयु. संघरत्न दामोदरे, आयु. भीमराव पवार, आयु. शैलेंद्र जाधव, आयु. उत्तम खराटे आणि केंद्रीय शिक्षक आयु. बी. के. बोदडे सर उपस्थित होते. बौद्ध धम्माचे संस्कार आणि प्रशिक्षणावर भर देहा दिवसांच्या या प्रशिक्षण शिबिरात बौद्ध धम्माची मूलभूत तत्त्वे, धम्मसंस्कार, श्रामणेर जीवनपद्धती तसेच बौद्धाचार्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे. धम्माचा अभ्यास, आचरण आणि समाजात धम्मविचारांचा प्रसार करण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या शिबिरामुळे सहभागी प्रशिक्षणार्थींना धम्मविषयक ज्ञान वाढविण्याची आणि धार्मिक-सामाजिक कार्यासाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. विविध पदाधिकाऱ्यांची उपस्थिती या उद्घाटन सोहळ्याला महाराष्ट्र राज्य पर्यटन सचिव आदरणीय के. वाय. सुरवाडे गुरुजी, जिल्हा सरचिटणीस सुशील कुमार हिवाळे, जिल्हा कोषाध्यक्ष प्रा. डॉ. संजीव सावळे, संरक्षण उपाध्यक्ष प्रमुख मेजर रमेश सावळे, जिल्हा पर्यटन सचिव वसंतदादा लोखंडे, जिल्हा संघटक उत्तम सुरवाडे गुरुजी, ए. टी. सुरडकर, उत्तम खराटे, ए. पी. जोहरे यांच्यासह जामनेर व मुक्ताईनगर तालुक्यांतील पदाधिकारी आणि बोदवड तालुका कार्यकारिणीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. भारतीय बौद्ध महासभेच्या बोदवड तालुका व शहर शाखेच्या वतीने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बोदवड तालुका कार्यकारिणीच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

देशाचे रक्षण करायचे की घरासाठी न्याय मागत फिरायचे?



जन सम्राट टाईम्स

धुळे । प्रतिनिधी: देशाच्या सीमेवर राहून देशाचे रक्षण करणाऱ्या जवानालाच स्वतःच्या घराच्या सुरक्षिततेसाठी संघर्ष करावा लागत असल्याचा प्रकार धुळ्यात समोर आला आहे. सीमा सुरक्षा दलात (बीएसएफ) कार्यरत असलेले जवान विनोद बोरसे यांनी घराच्या बांधकामात फसवणूक झाल्याचा आरोप केला आहे. अवघ्या दीड ते दोन वर्षांपूर्वी लाखो रुपये खर्चून बांधलेल्या घराच्या भिंतींना मोठ्या प्रमाणात तडे पडल्याने कुटुंबीयांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले. संबंधित कंत्राटदाराकडे वारंवार दुरुस्तीची मागणी करूनही प्रतिसाद मिळत नसल्याचा, तसेच पोलिसांकडे तक्रारी करूनही दखल घेतली जात नसल्याचा आरोप जवानाने केला आहे.

देशाच्या सीमेवर राहून देशाचे रक्षण करणाऱ्या जवानालाच स्वतःच्या घराच्या सुरक्षिततेसाठी संघर्ष करावा लागत असल्याचा प्रकार धुळ्यात समोर आला आहे.

टहाकळी–दोनगाव रस्त्यालगत नवीन वीज उपकेंद्र लवकरच मंजूर करणार!

पथराड–पाळधी खुर्द ३३/११ केव्ही उपकेंद्राचे लोकार्पण दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदतीचा विश्वास

जन सम्राट टाईम्स

धरणगाव। प्रतिनिधी: दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासन प्रयत्नशील असून, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी आर्थिक मदत मिळेल, असा विश्वास राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी व्यक्त केला. यासोबतच धरणगाव तालुक्यातील टहाकळी–दोनगाव रस्त्यालगत नवीन वीज उपकेंद्र लवकरच मंजूर करण्यात येईल, अशी घोषणा त्यांनी केली. पाणीटंचाईवर मात करण्यासाठी नाला खोलीकरण, जलसंधारण, पाणी अडविणे आणि शेतरस्त्यांच्या कामांनाही प्राधान्य देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. धरणगाव तालुक्यातील पथराड येथे नव्याने उभारण्यात आलेल्या ३३/११ केव्ही पथराड–पाळधी खुर्द वीज उपकेंद्राचे लोकार्पण पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या उपकेंद्रामुळे परिसरातील गावांमधील घरगुती वीज ग्राहकांसह शेतीपंपांना अधिक सक्षम आणि सुरळीत वीजपुरवठा मिळण्यास मदत होणार आहे. अनेक गावांतील शेतकऱ्यांना दिलासा पथराड–पाळधी खुर्द वीज उपकेंद्रामुळे पथराड गावठाण फीडरअंतर्गत पथराड, धार आणि शेरी या गावांना लाभ होणार आहे. तर दोनगाव गावठाण फीडरअंतर्गत टहाकळी, फुलपाट, आव्हाणी, भोकणी, दोनगाव तसेच पाळधी खुर्द येथील सागर कॉलनी परिसराला अधिक सक्षम वीजपुरवठा उपलब्ध होणार आहे. याशिवाय पथराड शेती फीडरअंतर्गत निमखेडे–झुरखेडा शिवार, पथराड, पाळधी खुर्द, टहाकळी आणि फुलपाट परिसरातील शेतीपंपांनाही या उपकेंद्राचा लाभ मिळणार आहे. वीजपुरवठ्याची क्षमता वाढल्याने शेतकऱ्यांना सिंचनाचे नियोजन करणे अधिक सुलभ होण्याची अपेक्षा आहे.



शेतकऱ्यांना दिवसा आठ तास वीज देण्यावर भर पालकमंत्री पाटील म्हणाले की, दुष्काळाच्या काळात पाण्याबरोबरच शेतीसाठी नियमित वीजपुरवठा होणेही महत्त्वाचे आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिवसा आठ तास वीज उपलब्ध करून देण्यावर शासनाचा भर आहे. विजेची मागणी वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन महावितरणने रोहित्रांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवावा. तांत्रिक बिघाडामुळे शेतकऱ्यांचा वीजपुरवठा दीर्घकाळ खंडित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे निर्देशही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. दुष्काळी परिस्थितीत जलसंधारणाची कामे प्रभावीपणे राबविणे आवश्यक असून, नाला खोलीकरण, पाणी अडविणे आणि शेतरस्त्यांच्या कामांमुळे ग्रामीण भागातील पाणीटंचाई कमी करण्यासह शेतीच्या कामांना मदत होईल, असेही त्यांनी नमूद केले. सूतगिरणी आणि चॉकलेट उद्योगातून रोजगाराच्या संधी धरणगाव तालुक्यात विकासकामांसोबत ग्रामीण भागात उद्योग उभारण्यावरही भर दिला जात असल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले. तालुक्यात प्रस्तावित सूतगिरणीच्या कामाला दिवाळीपर्यंत सुरुवात करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. याशिवाय परिसरात चॉकलेट निर्मितीचा उद्योगही लवकरच सुरू होणार असल्याचे त्यांनी नमूद केले. या उद्योगांमुळे स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे. दरम्यान, पथराड–पाळधी खुर्द वीज उपकेंद्राचे काम निर्धारित मुदतीत पूर्ण केल्याबद्दल पालकमंत्री पाटील यांनी मे. गार्गी इलेक्ट्रिकलच्या ठेकेदारांचे कौतुक केले. मान्यवरांची मनोगते कार्यक्रमात जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन संजय पवार, भाजपचे ज्येष्ठ नेते डी. जी. पाटील, पी. एम. पाटील आणि भगवान महाजन यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहायक अभियंता लोकेश चव्हाण यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन सहायक अभियंता रत्ना पाटील यांनी केले. यांची होती उपस्थिती यावेळी जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन संजय पवार, युवा नेते तथा माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील, भाजपचे ज्येष्ठ नेते डी. जी. पाटील, जिल्हा उपाध्यक्ष पी. सी. पाटील, गार्गी इलेक्ट्रिकलच्या यामिनी नारखेडे, शिवसेनेचे पी. एम. पाटील, तालुकाप्रमुख डी. ओ. पाटील, भाजप तालुकाध्यक्ष दिनेश पाटील, ॲड. संजय महाजन, भगवान महाजन, सचिन पवार, रवी चव्हाण, संजय पाटील, माजी सभापती प्रेमराज पाटील, अनिल पाटील, गोकुळ लंके, श्रीकांत चव्हाण, दिलीप पाटील, किशोर झंवर, अनिल कासट यांच्यासह परिसरातील सरपंच, शेतकरी, विविध पक्षांचे पदाधिकारी, महावितरणचे अधिकारी-कर्मचारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतरस्त्यांच्या कामांना प्राधान्य

दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासन प्रयत्नशील असून, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी आर्थिक मदत मिळेल, असा विश्वास राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी व्यक्त केला. यासोबतच धरणगाव तालुक्यातील टहाकळी–दोनगाव रस्त्यालगत नवीन वीज उपकेंद्र लवकरच मंजूर करण्यात येईल, अशी घोषणा त्यांनी केली. पाणीटंचाईवर मात करण्यासाठी नाला खोलीकरण, जलसंधारण, पाणी अडविणे आणि शेतरस्त्यांच्या कामांनाही प्राधान्य देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. धरणगाव तालुक्यातील पथराड येथे नव्याने उभारण्यात आलेल्या ३३/११ केव्ही पथराड–पाळधी खुर्द वीज उपकेंद्राचे लोकार्पण पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या उपकेंद्रामुळे परिसरातील गावांमधील घरगुती वीज ग्राहकांसह शेतीपंपांना अधिक सक्षम आणि सुरळीत वीजपुरवठा मिळण्यास मदत होणार आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

वाडी गावात मारहाणीच्या आरोपांवरून खळबळ!



जन सम्राट टाईम्स

धुळे । प्रतिनिधी : शिरपूर तालुक्यातील वाडी गावात मारहाणीच्या आरोपांवरून वातावरण तापले असून, संबंधितांवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी ग्रामस्थांनी पोलीस अधीक्षकांकडे धाव घेतली आहे. गावाचे उपसरपंच राजदर धनगर यांच्यासह काही जणांनी ग्रामस्थांना मारहाण करून त्रास दिल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. संबंधितांवर कारवाई न झाल्यास २ नोव्हेंबरपासून जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात आमरण उपोषणाला बसण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. गणेश विसर्जनाच्या गाण्यावरून वाद ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, गणेश विसर्जनावेळी वाजविण्यात आलेल्या गाण्यावरून वाडी गावात दोन गटांमध्ये वाद झाला होता.

या वादातून उपसरपंच राजदर धनगर, विशाल राजदर धनगर, विनोद राजधर धनगर यांच्यासह इतरांनी एका व्यक्तीला लाठ्या-काठ्या, लोखंडी रॉड आणि तलवारीने मारहाण केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या घटनेप्रकरणी शिरपूर तालुका पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेले असता पोलिसांनी तक्रार नोंदवून घेतली नसल्याचा आरोपही ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे संबंधितांवर कायदेशीर कारवाई व्हावी, या मागणीसाठी ग्रामस्थांनी पोलीस अधीक्षकांकडे दाद मागितली आहे. कारवाई न झाल्यास आमरण उपोषण गावात काही व्यक्तींकडून ग्रामस्थांना मारहाण करण्यासह विविध प्रकारे त्रास दिला जात असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. संबंधित प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास २ नोव्हेंबरपासून जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात आमरण उपोषण सुरू करण्याचा इशारा देण्यात आला आहे. या वेळी सुनील केले, नारायण कोळी, सुदाम तिरमले, विलास कोळी, सतीश कोळी, जगदीश तिरमले, विठ्ठल कोळी, तुकाराम तिरमले, रजूबाई तिरमले, संगीता कोळी, भारती तिरमले, सुरेखा तिरमले, सुनीता तिरमले, कल्पना कोळी यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. टीप : मारहाण आणि पोलिसांनी तक्रार नोंदवून न घेतल्याचे आरोप ग्रामस्थांनी केले आहेत. या आरोपांची स्वतंत्र पुष्टी आणि संबंधितांची बाजू उपलब्ध नसल्याने त्यांना आरोप म्हणूनच नमूद केले आहे.

नांदगावच्या महाविद्यालयात विद्यार्थ्यांकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा भेट!

पेपर फीच्या चर्चेदरम्यान लक्षात आली प्रतिमेची उणीव



जन सम्राट टाईम्स

नांदगाव । प्रतिनिधी शिक्षणासोबतच सामाजिक जाणीव, संविधानिक मूल्ये आणि महामानवांविषयी आदरभाव जपणारा प्रेरणादायी उपक्रम नांदगाव येथील मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी राबविला. महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा नसल्याचे लक्षात आल्यानंतर विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे पुढाकार घेत प्राचार्य डॉ. एन. यू. पाटील यांच्याकडे बाबासाहेबांची प्रतिमा भेट दिली. महाविद्यालयातील काही विद्यार्थी परीक्षा शुल्कासंदर्भात मार्गदर्शन घेण्यासाठी प्राचार्य डॉ. एन. यू. पाटील यांच्या दालनात गेले होते. यावेळी प्राचार्यांनी विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेत त्यांना मार्गदर्शन केले. चर्चेदरम्यान महाविद्यालयाच्या दालनात विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा नसल्याचे विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी एकमताने बाबासाहेबांची प्रतिमा महाविद्यालयाला भेट देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार प्राचार्य डॉ. एन. यू. पाटील तसेच सर्व वर्गशिक्षक आणि विभागप्रमुखांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा भेट दिली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी महामानवांविषयीचा आदर व्यक्त करण्यासोबतच शिक्षण, समता आणि संविधानिक मूल्यांप्रती आपली बांधिलकी अधोरेखित केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले. त्यांच्या विचारांचा जागर शैक्षणिक परिसरात कायम राहावा आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्यातून प्रेरणा मिळावी, हा या उपक्रमामागील महत्त्वाचा उद्देश होता. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे प्राचार्यांनी कौतुक केले. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाची भावना रुजविण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला. या स्तुत्य उपक्रमात विशाल पहान, ऋषिकेश निकम, दीपक अंभोरे, शुभम शेजवळ, अबीत खान, यश सोनवणे आणि साहिल मोरे या विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला. विद्यार्थ्यांच्या या कृतीतून शिक्षणासोबत सामाजिक भान जपण्याचा आणि महामानवांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा सकारात्मक संदेश देण्यात आला.

भालोद महाविद्यालयात डॉ. राम मनोहर लोहिया यांचा स्मृतिदिन साजरा

जन सम्राट टाईम्स



भुसावळ । (प्रतिनिधी): अन्यायाविरुद्ध लढण्याची जिद्द लोकशाहीत जिवंत असली पाहिजे. डॉ. राम मनोहर लोहिया यांनी यासाठीच आयुष्यभर संघर्ष केला. वर्णभेद, जातिभेद आणि स्त्री-पुरुष विषमता नष्ट करण्यासाठी सप्तक्रांतीची संकल्पना महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन मुक्ताईनगर येथील खडसे महाविद्यालयाचे राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. गणेश चव्हाण यांनी केले. सेकंडरी एज्युकेशन सोसायटी संचलित कला व विज्ञान महाविद्यालय, भालोद येथे राज्यशास्त्र विभागाच्या वतीने प्रख्यात समाजवादी विचारवंत, स्वातंत्र्यसैनिक आणि राजकीय नेते डॉ. राम मनोहर लोहिया यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. यानिमित्ताने 'सप्तक्रांती आणि सामाजिक समता' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

यावेळी प्रा. डॉ. चव्हाण बोलत होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. सुनील नेवे यांनी केले. विकास म्हणजे माणसाच्या प्रतिष्ठेची, स्वातंत्र्याची आणि समानतेची प्रस्थापना होय, असे त्यांनी सांगितले. समाजपरिवर्तनाची जबाबदारी केवळ सरकार, राजकीय पक्ष किंवा सामाजिक कार्यकर्त्यांची नसून प्रत्येक नागरिकाची आहे, हा डॉ. लोहिया यांच्या विचारांचा गाभा असल्याचे त्यांनी नमूद केले. विशेष व्याख्यानात प्रा. डॉ. गणेश चव्हाण यांनी डॉ. लोहिया यांच्या समाजवादी विचारप्रणालीचे विवेचन केले.

सप्तक्रांतीची संकल्पना, सामाजिक समता, जातीय विषमतेचे निर्मूलन, स्त्री-पुरुष समानता आणि लोकशाही मूल्यांचे महत्त्व याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. समताधिष्ठित समाजनिर्मितीसाठी डॉ. लोहिया यांच्या विचारांची आजही प्रासंगिकता असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. किशोर कोल्हे होते. अध्यक्षीय मनोगतात त्यांनी अशा व्याख्यानांमुळे विद्यार्थ्यांना भारतीय राजकीय विचारवंतांचे योगदान समजते, तसेच सामाजिक प्रश्नांकडे चिकित्सक दृष्टिकोनातून पाहण्याची प्रेरणा मिळते, असे सांगितले. यावेळी खडसे महाविद्यालय, मुक्ताईनगरचे प्राचार्य प्रा. डॉ. एच. ए. महाजन यांचे स्वागत डिंपल भालेराव हिने ग्रंथभेट देऊन केले. प्राचार्य प्रा. डॉ. किशोर कोल्हे यांचे स्वागत मोक्षदा कोंगे हिने, तर प्रा. डॉ. गणेश चव्हाण यांचे स्वागत अतिकेश माळी याने ग्रंथभेट देऊन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रा. डॉ. सुनील नेवे यांनी केले.

धुळ्यात मनसेचीमोहीम; मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याची मागणी

जन सम्राट टाईम्स

धुळे । प्रतिनिधी: मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) धुळ्यात आक्रमक भूमिका घेतली आहे. आयुक्तांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी मनसेच्या वतीने 'एक सही संतापाची' मोहीम राबविण्यात आली. जुन्या मनपा चौकात आयोजित या मोहिमेला नागरिकांचा प्रतिसाद मिळाल्याचा दावा मनसे पदाधिकाऱ्यांनी केला.



यावेळी कार्यकर्त्यांनी ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या आदेशानुसार आणि माजी आमदार प्रकाश भोईर यांच्या सूचनेनुसार, मनसेचे महानगराध्यक्ष संजय सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम राबविण्यात आली. एसआयआर मोहिमेवर मनसेचे गंभीर आरोप एसआयआर (विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण) मोहिमेच्या माध्यमातून कथित मतचोरीला मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी खतपाणी घातल्याचा आरोप मनसेने केला आहे. निवडणूक आयोग ही स्वायत्त संस्था असूनही तिच्या कारभारातील पारदर्शकतेबाबत संशय असल्याची भूमिका मनसे पदाधिकाऱ्यांनी मांडली. या पार्श्वभूमीवर मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि मतदारांच्या हक्कांच्या संरक्षणाचा मुद्दा उपस्थित करत मनसेने 'एक सही संतापाची' मोहिमेद्वारे आपला निषेध नोंदविला. या मोहिमेत नागरिकांच्या सह्या घेण्यात आल्या. पदाधिकारी, कार्यकर्त्यांची उपस्थिती या वेळी मनसेचे महानगराध्यक्ष संजय सोनवणे, राजेंद्र खैरनार यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भुसावळ तालुकास्तरीय शालेय क्रिकेट स्पर्धांचा उत्साहात समारोप!

१४, १७ व १९ वर्षांखालील मुला-मुलींचा उत्स्फूर्त सहभाग; विविध शाळांनी पटकावली विजेतेपदे

जन सम्राट टाईम्स

भुसावळ। प्रतिनिधी: फटकेबाजी, गोलंदाजांचा अचूक मारा आणि क्षेत्ररक्षणातील चपळता अशा रंगतदार खेळाने बियाणी मिलिटरी स्कूलचे मैदान तीन दिवस गाजले. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जळगाव आणि पंचायत समिती शिक्षण विभाग, भुसावळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय शासकीय शालेय क्रिकेट स्पर्धांचा उत्साहात समारोप झाला. १४, १७ व १९ वर्षांखालील मुला-मुलींच्या संघांनी स्पर्धेत सहभाग घेत आपले क्रीडाकौशल्य सिद्ध केले. विविध वयोगटांतील विजेत्या संघांनी उत्कृष्ट कामगिरी करत यश संपादन केले.



मान्यवरांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन स्पर्धेचे उद्घाटन भुसावळ पंचायत समितीचे गटविकास अधिकारी डॉ. कुलदीप ठाकरे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बियाणी एज्युकेशन संस्थेच्या सचिव डॉ. संगीता बियाणी होत्या. प्रमुख अतिथी म्हणून गटशिक्षणाधिकारी किशोरजी वायकोळे, बियाणी मिलिटरी स्कूलचे प्राचार्य डी. एम. पाटील, महाराष्ट्र राज्य क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाचे राज्य उपाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष आणि तालुका क्रीडा समन्वयक डॉ. प्रदीप साखरे, प्रा. मनोज वारके, मेघश्याम शिंदे, सुनील चौधरी, मुकेश मोरे, हिम्मत पाटील, विजय संकट यांच्यासह प्रशिक्षक, क्रीडाशिक्षक आणि खेळाडू उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते सरस्वतीपूजन व प्रतिमापूजन करण्यात आले. त्यानंतर श्रीफळ वाढवून स्पर्धेचा औपचारिक प्रारंभ करण्यात आला. "खेळाच्या माध्यमातून शाळेपासून देशापर्यंत नावलौकिक मिळवा!" उद्घाटनप्रसंगी गटविकास अधिकारी डॉ. कुलदीप ठाकरे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. विद्यार्थी जीवनातील अनुभव सांगताना त्यांनी खेळाडूंना मैदानावर सर्वोत्तम कामगिरी करण्याचे आवाहन केले. खेळ हा केवळ विजय किंवा पराभवापुरता मर्यादित नसून शिस्त, मेहनत, संघभावना, आत्मविश्वास आणि नेतृत्वगुण विकसित करण्याचे प्रभावी माध्यम आहे, असे त्यांनी सांगितले. चिकाटी आणि खेळातील प्रामाणिकपणा यांच्या बळावर खेळाडू यश संपादन करू शकतात. प्रत्येक खेळाडूने खिलाडूवृत्ती जपत आपल्या शाळेचे, तालुक्याचे, जिल्ह्याचे, राज्याचे आणि देशाचे नाव उज्ज्वल करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थ्यांचा सहभाग कौतुकास्पद : डॉ. संगीता बियाणी अध्यक्षीय भाषणात बियाणी एज्युकेशन संस्थेच्या सचिव डॉ. संगीता बियाणी यांनी सहभागी शाळा, खेळाडू आणि क्रीडाशिक्षकांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणासोबत क्रीडाक्षेत्रालाही महत्त्व देणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांना आपल्यातील कौशल्य दाखविण्याची संधी मिळते. विविध शाळांतील खेळाडूंना एकत्र खेळण्याचा अनुभव मिळतो. विजयी संघांनी पुढील स्पर्धांसाठी अधिक मेहनत घ्यावी.

दुकानाचे फोटो काढल्याच्या संशयावरून प्रमोद पाटील यांना मारहाण!

जन सम्राट टाईम्स

भुसावळ। प्रतिनिधी: दुकानाचे फोटो काढल्याच्या संशयावरून घरात घुसून मारहाण, शिवीगाळ आणि तोडफोड केल्याची घटना भुसावळ शहरात घडली. या प्रकरणी बापू भास्कर जंगले याच्याविरुद्ध भुसावळ बाजारपेठ पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दैनिक बातमीदार प्रमोद पाटील आणि त्यांच्या पत्नी संगीता पाटील यांना मारहाण केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. नेमकी घटना काय? पोलिसांत दाखल तक्रारीनुसार, श्रद्धानगर येथील माऊली प्लाझा परिसरात राहणारे प्रमोद पाटील हे शनिवार, दि. १० ऑक्टोबर रोजी दुपारी एकच्या सुमारास घरी विश्रांती घेत होते. त्यावेळी बापू



भास्कर जंगले (रा. तापी पब्लिक स्कूलजवळ, भुसावळ) याने त्यांच्या घराची बेल वाजवली. दरवाजा उघडल्यानंतर आरोपीने आपल्या दुकानात येणाऱ्या मुला-मुलींचे फोटो काढल्याचा आरोप करत पाटील यांना जाब विचारला. त्यावर आपण दुकानाचे फोटो न काढता बेकायदेशीर होर्डिंगचे फोटो काढल्याचे प्रमोद पाटील यांनी सांगितल्याचे तक्रारीत नमूद आहे. यानंतर वाद